हुतात्मा स्मारकाच्या वार्षिक अनुदानामध्ये वाढ करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक: हुस्मार-१०९६/प्र.क्र. ६८/९६/स्वातंत्र-१,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ५ नोव्हेंबर, १९९७.

वाचा:- शासन निर्णय क्र. हुस्मार-१०८२/१२३, दि. २०.७.१९८३.

**शासन निर्णय:-**

देशाच्या स्वातंत्र्यासाठी झालेल्या चळवळीत ज्या स्वातंत्र्य वीरांनी भाग घेतला व प्राणार्पण केले अशा स्वातंत्र्य वीरांच्या स्मरणार्थ राज्यात २०६ ठिकाणी शासनाने हुतात्मा स्मारके उभारली असून या हुतात्मा स्मारकांची देखभाल व परिरक्षा करण्यासाठी शासनाकडून प्रत्येक हुतात्मा स्मारकासाठी प्रतिवर्षी रु. २६५०/- अनुदान दिले जाते.

२. जिल्हा परिषदांना द्यावयाचे अनुदान जिल्हाधिकारी यांमार्फत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व नगर परिषदा/नगरपालिका/महानगरपालिका यांना द्यावयाचे अनुदान जिल्हाधिकारी यांकडे सोपविण्यात येते. शासन निर्णय क्र. हुस्मार-१०८२/१२३, दिनांक २० जुलै ८३ अन्वये प्रत्येक हुतात्मा स्मारकासाठी प्रतिवर्षी देण्यात येणाऱ्या देखभाल व दुरुस्तीसाठीच्या रु. २,६५०/- या अनुदानामध्ये वाढ करण्याची विनंती जिल्हाधिकारी व जिल्हा परिषद यांच्याकडून शासनाकडे करण्यात आल्यामुळे शासनाने त्यांचा विचार केला व आता या शासन निर्णयाद्वारे त्यात वाढ करून ते प्रत्येक हुतात्मा स्मारकासाठी प्रतिवर्षी रु. १०,०००/- इतके करण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

३. हुतात्मा स्मारकाच्या देखभाल व परिरक्षा यासाठी होणारा खर्च "२०५९ सार्वजनिक बांधकामे [डी]-परिरक्षा व दुरुस्ती-[९]-हुतात्मा स्मारकांचे परिरक्षण निगा" [कोड नं. २०५९००१५] या शीर्षाखाली दाखविण्यात यावा व त्यासाठी मंजूर होणाऱ्या उपलब्ध अनुदानातून भागविण्यात यावा.

४. वरील परिच्छेदात निर्देशित केलेली वाढ ही १९९८-९९ या वर्षापासून देण्यात येणार आहे. तसेच या २०६ हुतात्मा स्मारकांचा सुयोग्य वापर व्हावा, त्यांची देखभाल व्यवस्थित होऊन ती सुस्थितीत रहावीत यासाठी राज्य शासनाकडून

पृ. मा. प.

वेगळे सविस्तर आदेश लवकरच निर्गमित करण्यात येत आहेत.

५. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. १०१४/प्र.क्र. २४७/९७ व्यय-४, दि. ४ मार्च, १९९७ च्या अनुषंगाने काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[ य. पां. देशले ]
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,
राज्यपाल यांचे सचिव,
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक,
मा. सभापती, स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समिती, मंत्रालय, मुंबई,
स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समितीचे सर्व सदस्य (नावाने),
मा. सदस्य सचिव, स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समिती, मंत्रालय, मुंबई,
सचिव (सा. उ. वि.) सा. प्र. वि. मंत्रालय, मुंबई.
[illegible], मंत्रालय, मुंबई,
सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई,
इतर मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदा,
सर्व नगर परिषदा/नगर पालिका/महानगरपालिका,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
महालेखापाल (लेखा परीक्षा), मुंबई,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई,
महालेखापाल (लेखा परीक्षा), नागपूर,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
स्वातंत्र्य सैनिक कक्ष (२) व (३),
निवड नस्ती.